


ग़ज़ल नवाज़
भीमराव पांचाळे



झ-याच झुळझुळणारं पाणी...,
दवबिंदूचं पारदर्शी रुप...,
उगवतीचे रंग.. कि ढळत्या सूर्यबिंबाची सोनेरी किरणं...
अधीर ओठांचे स्पर्श कि दहकत्या तारुण्याचे आवेग...
**कशाला म्हणायचं ग़ज़ल ?**

सुरावटीतून उलगडत जाणारे स्वर.. कि स्वरांतून आंदोलित होणा-या
मुलायम रेशमी भावभावना..
मदालसेचं उत्कट रुप कि मदनाचा मोहक अविष्कार...
सप्तरंगाचं असीम इंद्रधनुष्य.. कि पावसाच्या चिंब धारांत मिटून गेलेली रात्र..
कशाला म्हणायचं ग़ज़ल ?
हृदयाच्या तारांतून थिरकणारं स्वप्न म्हणजे तर नव्हे ग़ज़ल ?
कि ग़ज़ल म्हणजे डोळयातल्या बाहुल्यांत उठणा-या तरंगाचं स्वप्नदृष्य?
तरलता, मोहकता, नज़ाकत आणि संवेदनशील हृदयातल्या सगळया भावनांची
दृष्यरुप अभिव्यक्ति म्हणजे तर नव्हे ग़ज़ल ?
ग़ज़लचं रुप शोधता शोधता ती भेटते-
ग़ज़लनवाज़ भीमराव पांचाळे
यांच्या गायनात..


श्वास ग़ज़ल निःश्वास ग़ज़ल
जगण्याचा विश्वास ग़ज़ल

## ग़ज़ल नवाज़

मराठी ग़ज़लचे खलिफा, कविवर्य सुरेश भट यांनी दीनानाथ मंगेशकर हॉल, मुंबई
येथील मैफिलित रसिकांच्या साक्षीने बहाल केलेली ही उपाधी
ग़ज़लनवाज़ भीमराव पांचाळे...

## रियाज़

अमरावतीचे पं.भैय्यासाहेब देशपांडे व अकोला येथील पं.एकनाथपंत कुलकर्णी
या दोन गुरुवर्यांकडून ९ वर्षे शास्त्रीय गायनाचे शिक्षण..
संगीताच्या शिक्षणासोबतच वाणिज्य शाखेची पदवी. मराठी साहित्य, हिंदी साहित्य,
संगीत या विषयातील पदव्या, उर्दू भाषेचा अभ्यास.. पुढे नोकरी.. असा जीवनक्रम...
सुरुवातीच्या काळात ख्याल,ठुमरी, भक्तिसंगात, नाटयसंगीत, भावगीते इत्यादि
सर्व शास्त्रीय-उपशास्त्रीय व सुगम गायन प्रकारांची प्रस्तुती..



## मराठी संगीतातले नवे पर्व

उर्दू सोबत मराठी ग़ज़लचा जीवनात प्रवेश.. ग़ज़ल हेच आयुष्याचे मिशन..
१९७२ साली ग़ज़ल गायन मैफिलींना प्रारंभ केला..
'ग़ज़ल एके ग़ज़ल ' असा अविरत प्रवास ३७ वर्षांपासून सुरु..
मराठी व उर्दू ग़ज़ल एकाच मंचावरुन पेश करुन भाषासमन्वयाची मिसाल कायम केली..
जुने-नवे, प्रसिद्ध-अप्रसिद्ध अशा सर्वच ग़ज़लकारांना एकत्र केले व त्यांच्या ग़ज़ला स्वरबद्ध करुन पेश केल्या..महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरही प्रचंड संख्येने ग़ज़लचा चाहता वर्ग निर्माण केला..
मराठी ग़ज़ल सर्वदूर रसिकांपर्यंत पोहोचवली..

## आशयप्रधान गायकी

ग़ज़ल ही काळजाची भाषा,ग़ज़लचा प्रत्येक शेर ही एक परिपूर्ण कविता- ठासून भरलेल्या आशयाची..
हा आशय संगीताच्या सहाय्याने रसिकांच्या थेट काळजापर्यंत 'हे हृदयीचे ते हृदयी' पोहोचविणारी अशी ही आशयप्रधान गायकी..
आशयाला प्रधान व संगीताला दुय्यम ठेवून गायकी साकार करायची म्हणजे
गायकीचा भार न होऊ देता शब्दातील आशयाला स्वरांचे कोंदण देणारी
आपली खास अशी ग़ज़ल गायन शैली साकार केली..
रसिकांची भरभरुन दाद या गायकीला मिळाली.. रसिकाश्रय मिळाला..

## आकाशवाणी... दूरदर्शन..

हिंदी व मराठी सुगम संगीतासाठी १९७५ पासून आकाशवाणी कलावंत म्हणून मान्यता .. अ श्रेणी ..
महाराष्ट्रा व्यतिरिक्त मध्यप्रदेश, बिहार, ओरिसा, गुजरात, अंदमान निकोबार, गोवा,
कर्नाटक, आंध्र, बंगाल, दिल्ली इत्यादि राज्यातील अनेक आकाशवाणी केंद्रांतर्फे मैफ़िली व ध्वनीमुद्रण..
दूरदर्शन, सहयाद्री, ई-टीव्ही, सहारा, झी टीव्ही, स्टार माझा, एनडीटीव्ही, आयबीएन, इ.,
अनेक वाहिन्यांवरुन ग़ज़ल गायनाचे प्रस्तुतिकरण..

## अनगिनत मैफ़िली

गेल्या ३७ वर्षांत अनगिनत ग़ज़ल मैफ़िली महाराष्ट्र व राज्याबाहेर,
शहरांपासून गावांपर्यंत रसिकांच्या सेवेत पेश केल्या..
आकाशवाणी संगीत सभा, शासकीय कला महोत्सव, अपना उत्सव, अखिल भारतीय सााहित्य संमेलने,
अखिल भारतीय मराठी ग़ज़ल संमेलने,नेहरु सेंटर, एनसीपीए, यशवंतराव चव्हाण सेंटर, सूरसिंगार,
नवी मुंबई संगीत संमेलन,पिंपरी-चिंचवड स्वर सागर संगीत महोत्सव,प्रतिभा संगम सा.संमेलन,
अमरावती विद्यापीठ दीक्षांत समारंभ, बडोदे फेस्टिवल,महाराष्ट्र मंडळ, हैदराबाद,अ. भा. नाटय संमेलन,
मुस्लिम मराठी साहित्य संमेलन, महाराष्ट्र सदन, दिल्ली, कला अकादमी, गोवा आणि अशा अनेक
नामचिन संस्थांमार्फत ग़ज़ल मैफिलींचे आयोजन..

## संगीत दिग्दर्शन

अनेक नाटकं व मना सज्जना, पंख तुटलेले पक्षी, सखा माझा ज्ञानेश्वर, इत्यादि टेलीफिल्म्स,मर्मबंध ही दूरदर्शन मालिका, झंझावात, प्रेमसाक्षी हे चित्रपट.. इ.चे संगीत दिग्दर्शन.आशा भोसले, सुरेश वाडकर, रविन्द्र साठे, उत्तरा केळकर, देवकी पंडीत, कविता कृष्णमूर्ति,जयवंत कुलकर्णी, अजित कडकडे इत्यादिंचा गायक-गायिका म्हणून सहभाग..दिग्दर्शक म्हणून श्रीमान राजदत्त यांची साथ..

## कॅसेट्स - सीडीज

एकूण १५ कॅसेट्स व सीडीज रसिकांच्या सेवेत सादर.. एक जखम सुगंधी, शब्द सुरांची भावयात्रा, स्वप्न तारकांचे,ग़ज़ल उसने छेडी, ग़ज़ल गुंजन, भावनांची वादळे, तेजाब दुःखाचे या ग़ज़लांच्या सीडीजना प्रचंड लोकप्रियता लाभली..

## सहाय्यार्थ मैफ़िली

ग़ज़ल गायन मैफ़िलींच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणा-या अनेक गरजू संस्था उदा. आंध्र वादळग्रस्त, विवेकानंद वाचनालय, अकोला, आदर्श विद्यार्थीगृह अमरावती, लोक बिरादरी प्रकल्प , हेमलकसा, ग्रामीण शिक्षण मंडळ, चंद्रपूर, बहुजन संघर्ष, नागपूर,सत्यशोधक ज्ञानपीठ, धुळे,ग़ज़ल सागर प्रतिष्ठान, मुंबई, वात्सल्य ट्रस्ट, न. मुंबई, अस्मिता अपंग पुर्नवसन,बदलापूर,श्रमिक पत्रकार संघ,वर्धा,दीप प्रतिष्ठान अमरावती, त्रैलोक्य बौद्धमहासंघ व सन्मित्र ट्रस्ट, मुंबई आदिंना भरघोस आर्थिक मदतीचा हात..

## मराठी ग़ज़लच्या प्रचार व प्रसाराचे कार्य

ग़ज़ल गायनाच्या मैफ़िलींबरोबरच मराठी ग़ज़लच्या प्रचार व प्रसाराचे कार्य १९७२ पासूनच सुरु केले.. प्रतिभावंतांनी ग़ज़ल लेखन व गायनाकडे वळावे, ग़ज़लच्या आकृतिबंधाचे तंत्र कळावे आणि ग़ज़ल करिता पोषक वातावरण निर्माण व्हावे या हेतूने कार्याची सुरुवात..यासाठी '**ग़ज़ल सागर प्रतिष्ठान**' स्थापन.. ग़ज़ल लेखन व गायन कार्यशाळांचे आयोजन,ग़ज़लचे छंदशास्त्र, कारवा, खावर, विदर्भाची मराठी ग़ज़ल, ग़ज़लिका,शब्द झाले सप्तरंगी, मनःस्पंदन,आंतरसल, ऋतु वेदनांचे, ग़ज़ल विश्व, स्पर्शांकुर (ब्रेल) इ. पुस्तके प्रकाशित..'ग़ज़ल सागर' या त्रैमासिकाचे प्रकाशन..वृत्तपत्रांमधून ग़ज़ल संबंधीचे स्तंभ लेखन.. परिसंवाद, ग़ज़ल मुशायरे, चर्चा सत्रे आणि मुंबई, नाशिक, अमरावती,औरंगाबाद, वाई अशा पाच अखिल भारतीय मराठी ग़ज़ल संमेलनांचे यशस्वी आयोजन..'ग़ज़ल गुरुकुल' उभारण्याचे स्वप्न..

## पुरस्कार..सन्मान..

ग़ज़ल गायकोच्या प्रवासात प्राप्त झालेले काही ठळक सन्मान ..पुरस्कार..

सूरसिंगार मानचिन्ह(१९७७), ग़ज़लनवाज उपाधी (१९८८), फुले-शाहू-आंबेडकर स्मृति पुरस्कार(१९९९), पोलिस आयुक्त व मोहल्ला एकता समितिचा सन्मान(१९९६), डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार(१९८८), स्वर-गंगा राष्ट्रीय एकात्मता मंच सन्मान (१९९९),कलाब्रम्ह पुरस्कार(२००१), महाराष्ट्र शासनाचा सेतू माधवराव पगडी राज्य पुरस्कार (२००२),विदर्भरत्न पुरस्कार(२००३), दया पवार पुरस्कार(२००८)..